
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
५४८६
IRBK-0105486
IRBK-0105486

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल. वा.
दा. क्र. ५४८६



# बापूजींच्या गोड गोष्टी

साने गुरुजी

साधना प्रकाशन ३.

# बापूजींच्या गोड गोष्टी

भाग तिसरा

लेखक

साने गुरुजी

अनुक्रम ...
विषय ...
क्रमांक ...
नों. दि. ...

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. ५४८६ नों. दि. ...

IRBK-0105486

साधना प्रकाशन, ३७४ शनवार पेठ, पुणे २.

किंमत सहा आणे

# दोन शब्द

साने गुरुजींनीं १९४८ सालीं मुंबईहून ' **कर्तव्य** ' हें सायं-दैनिक सुरू केलें होतें. त्या दैनिकांत गुरुजी नियमानें गांधीजींच्या जीवनांतील वेंचक प्रसंगांच्या कथा देत असत. त्या कथांच्या जोडीला आणखी भर घालून बापूजींच्या गोड गोष्टींचे हे सहा भाग गुरुजींनीं तयार केले. या सहा भागांत मिळून १२२ गोष्टी दिलेल्या आहेत.

या गोड गोष्टी सांगतांना जाणूनबुजून गुरुजींनीं विषयानुक्रम किंवा कालानुक्रम ठेवला नव्हता. गांधीजींचें विविधरंगी, विविधगंधी मंगल दर्शन व्हावें या दृष्टीनें या पुस्तकांची रचना करण्यांत आली आहे. मुलांना विविधतेंत मौज वाटतें म्हणून ही अशी मोकळी रचना केलेली आहे.

सहाहि भागांची पुनर्मुद्रणें काढण्याचें भाग्य ' साधना प्रकाशन 'ला लाभलें, हा कथाविषय आणि कथालेखक यांचा महिमा आहे. गांधीजींच्या भक्तिप्रेमानें ओथंबलेल्या साने गुरुजींच्या भावप्रधान लेखणींतून उतरलेल्या ह्या प्रेरक प्रसंग-कथा आहेत. These little things are great to little men ह्या छोट्या गोष्टी छोट्यांच्या जीवनाच्या दृष्टीनें भारी मोलाच्या आहेत.

पहिल्या आवृत्त्यांप्रमाणेंच हीं पुनर्मुद्रणेंहि सर्वत्र जावोत.

—**प्रकाशक**

तिसरी आवृत्ति : जानेवारी १९५६ : सर्व हक्क स्वाधीन

**प्रकाशक : यदुनाथ थत्ते**, साधना प्रकाशन, ३७४ शनिवार पेठ, पुणें २.
**मुद्रक : चिं. ग. वझे**, साधना प्रेस, ३७४ शनिवार पेठ, पुणें २.

अनुक्रम 20.4.7
विभाग ...
क्रमांक ...

# बापूजींच्या गोड गोष्टी

दुसऱ्या भागावरून पुढें सुरू

## ३६

त्यावेळेस महात्माजी सेवाग्रामला होते. ते सकाळीं संध्याकाळीं फिरायला जात. एकदां एक श्रीमंत मारवाडी गांधीजींची भेट घेऊं इच्छित होता. त्याच्या मुलाचें नुकतेंच लग्न झालें होतें. मुलाला आणि सुनेला महात्माजींच्या पायांवर डोकें ठेवायला लावावें असें त्याच्या मनांत होतें. बापूजींचे मंगल आशीर्वाद वधूवरांस मिळावे म्हणून त्या पित्याला फार आशा होती.

" तुम्ही सकाळीं या. बापू फिरायला जातात तेव्हां वाटेंत भेटा. घेऊन या मुलाला, सुनेला " असें सांगण्यांत आलें.

"वाटेंत नक्की भेटतील ? तुम्ही रागावणार तर नाहीं ना?"

"आम्ही रागावलों तरी बापूजी थोडेच रागावणार आहेत ? सकाळीं वाटेंत भेटा."

तो श्रद्धावान् मारवाडी गेला. सकाळ केव्हां होते याची तो वाट पहात होता. सारी मंडळी लवकर उठली. वधू-वर, वराचे

मायबाप निघाले. महात्माजींच्या फिरायला जायच्या रस्त्यावर वाट पहात ती सारी मंडळी उभी होती.

पक्ष्यांची किलबिल सुरू झाली. सृष्टि प्रसन्न होती आणि तिकडून महात्माजींच्या मुक्त हास्याचा मंगल आवाज आला. आले, महात्माजी आले. भारताचें परब्रह्म चालत येत होतें.

"पायां पडा. महात्माजींच्या पायां पडा" मारवाडी बोलला.

वधूवरांनीं त्या पवित्र चरणांवर मस्तक ठेवलें. महात्माजींनीं प्रेमानें त्यांना वर उठविलें. क्षणभर बापू गंभीर होते. कां बरें?

त्या वधूच्या मुखावर घुंगट होता. बुरखा होता. ती गुलामगिरी बापूंना कशी सहन होणार? डोळे असून आंधळें होणें. पावित्र्य मोकळेपणांतच फुलतें. बापूजींनीं त्या मुलीच्या मुखावरचा घुंगट दूर केला. ते त्या मुलीच्या सासऱ्यास म्हणाले: "मी हा पडदा दूर केला आहे. या मुलीचें मुखमंडल असें नेहमीं मोकळें ठेवा. पुन्हां हा घुंगट तोंडावर नको."

"आपली आज्ञा. आपल्या आज्ञेविरुद्ध आम्ही नाहीं. तुमचा आशीर्वाद असो" सासरा म्हणाला.

"जें चांगलें आहे त्याला प्रभूचा आशीर्वाद नेहमीं असतोच" असें म्हणून त्या वधूवरांच्या मस्तकावर मंगल हात ठेवून महात्माजी वेगानें फिरावयास निघून गेले.

भारताला मुक्त करणारा महात्मा भारतांतील सर्वांच्या जीवनांत खरें स्वातंत्र्य आणूं इच्छित होता. कितीतरी जणांच्या

जीवनांत बापूंनीं अशी क्रांति केली असेल ! जगाला तो सारा इतिहास कोण सांगणार ? बापूंसारखा क्रांतिकारक झाला नाहीं.

• • •

## ३७

महात्माजी देशांतील दरिद्रनारायणाला पोटभर अन्न कसें देतां येईल या चिंतेंत असत. या देशांत कोट्यवधि लोक. त्याना घरींच कोणता धंदा देऊं, कोणतें काम देऊं ? विचार करतां करतां त्यांना चरकाभगवानाचें दर्शन झालें. त्यांचे पुतणे श्री. मगनलाल यांनीं सर्वत्र हिंडून गांधीजींना चरका आणून दिला. देशांत पुन्हां चरक्याचें गूं गूं सर्वत्र सुरू झाल्याशिवाय तरणोपाय नाहीं अशी त्यांची खात्री झाली. लोकांना या क्षणीं दोन घांस मिळूं देत. या क्षणीं आणा दोन आणे मिळूं देत. पावसाचे थेंब पडतांच जमीन हिरवीगार दिसते, त्याप्रमाणें चरका थोडें थोडें देत गेला तरी संसारांत थोडा राम येईल, असें त्यांना वाटलें. आणि चरका, खादी यांचा प्रचार सुरू झाला. ओरिसांत इतकी गरिबी कीं खरोखरच चरक्यावर गरिबांना दोन आणे जेव्हां मिळूं लागले तेव्हां त्यांचे डोळे कृतज्ञतेनें भरून आले. चरक्यानें राष्ट्रांत कोठें किती आशा उत्पन्न केली तें आपणास कळणार नाहीं. चरक्याचे इतर उपयोग आहेतच. आपण काततों म्हणजे

श्रमाची प्रतिष्ठा करतों. आपण श्रमणाऱ्या जनतेशीं जोडले जातों. मनांतहि निर्मलता येते. एकाग्रता होते. एक शांत आनंद वाटतो.

कर्नाटकांत गांधीसेवासंघाचें हुदली गांवीं अधिवेशन होतें. त्या ठिकाणीं महात्माजी म्हणाले : “ माझ्या देवाचें नांव मी चरका ठेवलें आहे.” थोर उद्गार, थोर श्रद्धा. देवाचीं अनन्त नांवें आहेत. चरका अन्न देतो, आधार देतो. चरका स्वाभिमान शिकवितो. म्हणून चरका देव. आधार देणारी जणूं देवता. आणि महात्माजी या देवाचे महान् उपासक.

एकदां बोलतां बोलतां गांधीजी म्हणाले : “ या चरक्याच्या आसक्तींत मी गुंतून तर नाहीं ना जाणार ? मरतांना ओंठावर रामनाम येण्याऐवजीं चरका चरका असें तर नाहीं ना येणार ? ” जवळ जमनालालजी होते. ते म्हणाले : “ बापू, चिंता करूं नका. चरक्याची काळजी नका करूं. त्याला जनता मरूं देणार नाहीं.”

महात्माजींना स्मरून आपण रोज थोडें कांतलें तर किती छान होईल ? पू. विनोबाजी म्हणाले : “ महात्माजींची मूर्ति खादींत आहे.” खरें आहे नाहीं ?

• • •

# ३८

गांधीजी तिसऱ्या वर्गानेंच नेहमीं प्रवास करीत. गरिबांच्या जीवनाशीं ते एकरूप झालेले. त्यांना या वर्गानें जातांना अनेक अनुभवहि येत. गांधीजींची नम्रता, निरहंकारता अशा वेळेस सुंदर रीतीनें प्रकट होई.

एकदां बापूजी तिसऱ्या वर्गानें असेच जात होते. एका स्टेशनावर खूप गर्दी होती. गांधीजी या गाडीनें जात आहेत, अशी वार्ता तेथें नव्हती. नाहींतर दर्शन घ्यायला हजारों लोक आले असते. 'महात्मा गांधी की जय' या जयघोषानें सारा भाग दुमदुमून गेला असता. परंतु आज तसे जयघोष नव्हते. गाडी स्टेशनावर फार थोडा वेळ थांबणार होती. ते पहा एक गृहस्थ. त्यांचें सामान किती ! कोणी शेटजी आहेत कीं काय ? स्वतः आंत जाण्याआधीं ते सामानाला आधीं आंत टाकत होते. गाडी सुटली. हमालाचा हमालीसाठीं तगादा. शेटजी घाईत चढूं लागले. पडणारच होते. हमालानें शेटजींचा देह कसाबसा आंत लोटला. पडतां पडतां शेटजी वांचले. ते आंत सामानावर बसले. जीवांत जीव आल्यावर त्यांनीं सामान जरा नीट लावलें.

पुढचें मोठें स्टेशन आलें. तेथें हजारों लोक बापूजींच्या दर्शनार्थ जमलेले. जयघोषांनीं दशदिशा भरल्या. महात्माजींनीं सर्वांना दर्शन दिलें. "हरिजन के वास्ते" म्हणून हात पुढें

केला. लोकांनीं जवळ होतें तें दिलें. पुन्हां गाडी सुरू झाली. महादेवभाई व इतर पैसे मोजूं लागले.

शेटजींच्या लक्षांत आलें कीं महात्माजी ज्या डब्यांत आहेत त्या डब्यांत आपण चढलों आणि म्हणूनच पडतां पडतां वांचलों. महात्माजींची कृपा. त्या शेटजींचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें. ते हळूच उठले. भीतभीत गांधीजींच्याजवळ गेले. थरथरत उभे राहिले. त्यांनीं गांधीजींचे पाय धरले.

" हें काय? काय झालें? काय हवें?" गांधीजींनीं विचारलें.

" महाराज, आपण या डब्यांत होतात. मला माहीतहि नव्हतें. मी मागच्या स्टेशनवर चढतांना पडत होतों. परंतु वांचलों. आपली कृपा."

" मी या डब्यांत होतों म्हणून तुम्ही पडत होतांत. वांचलेत ईश्वराच्या कृपेनें " महात्माजी गंभीरपणें म्हणाले.

• • •

## ३९

पुण्याला १९३२ मध्यें हरिजनांना स्पृश्य हिंदूंपासून कायद्यानें कायमचें अलग करूं नये म्हणून महात्माजींनीं उपवास सुरू केला. मग पुणें करार झाला. पुढें तुरुंगांतून हरिजनांसाठीं हरिजन वर्तमानपत्रांत लिहिण्याची त्यांनीं परवानगी मागितली. ती मिळेना म्हणून त्यांनीं उपवास सुरू केला. त्यांना सोडून

देण्यात आलें. परंतु ते कायदेभंग करायला निघाले. कारण लढा सुरू असतांना ते बाहेर कसे राहणार ? सरकारनें पुन्हां पकडलें. पुन्हां लिहिण्यासाठीं परवानगी. पुन्हां उपवास. सरकार तर दुराग्रही, हट्टी, एकप्रकारें निर्लज्ज. शेवटीं महात्माजीनींच सरकारनें बाहेर सोडल्यावर जाहीर केलें कीं "वर्षभर मी तुरुंगांतच आहें असें समजेन. इतर राजकीय कार्य करणार नाहीं. हरिजनांचेंच काम करीन." आधीं एकवीस दिवसांचा तेथें पर्णकुटींत त्यांनीं उपवास केला आणि नंतर ते हिंदुस्थानच्या दौऱ्यावर निघाले. तोच त्यांचा प्रसिद्ध अस्पृश्यता-निवारणाचा दौरा होय. दौरा मध्यप्रांतांतून सुरू झाला. मध्यप्रांन्ताचे सिंह बॅ. अभ्यंकर त्यांच्याबरोबर होते.

आज नागपूरला सभा होती. लाखों लोक जमले होते. महात्माजींना थैली अर्पण करण्यांत आली. त्या वेळेस बॅ. अभ्यंकरांच्या पत्नीनें अंगावरचे दागिने दिले.

" बापू, हे शेवटचे दागिने, माझ्या पत्नीजवळ आतां दागिना उरला नाहीं " अभ्यंकर म्हणाले.

" ठीक. परंतु तुम्हाला अजून जेवण मिळण्याची तर चिन्ता नाहीं ना ? अभ्यंकरांना जेवणहि मिळणें कठिण झालें आहे असें ऐकेन त्या दिवशीं मी आनंदानें नाचेन " गांधीजी म्हणाले.

बापूजींचें ज्यांच्यावर प्रेम असे त्यांच्यापासून ते जास्तींत जास्त त्यागाची अपेक्षा करीत.

• • •

# ४०

नागपूर प्रान्तांतील महात्माजींचा अस्पृश्यता-निवारणाचा दौरा सुरू होता. एकदां काय झालें, महात्माजींचा हात पुसण्याचा रुमाल कामाच्या गर्दीत धावपळींत कोठें तरी मागील मुक्कामीं राहिला. वाळत घातलेला बहुधा राहिला. महात्माजींनां रुमाल हवा होता. त्यांनीं महादेवभाईंना विचारलें. ते म्हणाले: "आणतों शोधून." महादेवभाईंनीं सारें शोधलें. रुमाल सांपडेना. हरवला म्हणून बापूजींना जाऊन कोणीं सांगायचें? शेवटीं महादेवभाई येऊन म्हणाले:

"बापू, रुमाल मागें राहिला. कोठें तरी हरवला बहुधा. मी दुसरा आणून देतों."

थोडा वेळ बापू कांहीं बोलले नाहींत. नंतर म्हणाले:

"तो किती दिवस गेला असता?"

"आणखी चार महिने जाता."

"तर मग चार महिने मी रुमालाशिवाय काढीन. चुकीचें प्रायश्चित्त. त्यानंतर दुसरा रुमाल."

महादेवभाई काय बोलणार?

## ४१

ही दिल्लीची गोष्ट. बिर्लाभवनांत गांधीजी उतरले होते. ते स्नानगृहांत गेले. श्री बिर्लाशेट नुकतेच अंघोळ करून गेले होते. त्यांचा धोतराचा बोळा तेथेंच पडलेला होता. बापूंनीं तें धोतर स्वच्छ धुतलें नंतर स्नान करून स्वतःचा पंचा धुवून बाहेर आले आणि पंचा वाळत घालून बिर्ला शेटजींचें धोतरहि झटकून वाळत घालीत होते. इतक्यांत शेटजी आले. ते एकदम धोतर हिसकून घेऊन म्हणाले :

" बापू हें काय ? "

" तेथेंच पडलें होतें. कोणाचा पायबिय पडायचा स्वच्छ धोतरावर. धुतलें त्यांत काय बिघडलें ? स्वच्छतेच्या कामाहून अधिक थोर काम तरी कोणतें ? "

अनुक्रम 20680
विभाग
क्रमांक
नों. दि.

## ४२

मद्रास प्रान्तांतील हरिजन दौरा सुरू होता. एका स्टेशना-जवळ खाण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. बापूंना वाटलें कीं येथें शेळीचें दूध वगैरे कोठून असणार ? परंतु त्यांनीं आधीं विचारलें नाहीं. जेवणाची वेळ झाली. तिकडे जयजयकार होत

होता. बापू पानावर बसले. मीराबेन बसल्या. इतर मंडळी बसली. बापूंचें जेवण संपत आलें. मीराबेन कोबीचीच उकडलेली भाजी खात. बापू उठणार इतक्यांत यजमानीणबाई आली नि म्हणाली :

" महात्माजी थांबा. हें शेळीचें दूध आणलें आहे."

" शेळीचें ? "

" हो. चार दिवसांपासून एक शेळी मुद्दाम आणली. तिला चांगलें चांगलें खायला घातलें. गाजरें वगैरे. दूध गोड यावें म्हणून. हें दूध सात पदरांतून गाळलें आहे. वाफेवर तापवलें आहे. घ्या."

" परंतु माझें पोट तर भरलें."

" असें नका करूं."

" मीराबेनना द्या."

" बापू, माझेंहि पोट भरलें आहे. "

गांधीजींनीं मीराबेनना खूण केली. यांना किती वाईट वाटेल, असा भाव त्यांच्या दृष्टींत होता.

" बरं आणा " मीराबेन म्हणाल्या.

" घ्या. तुम्ही तरी घ्या. तें महात्माजींनाच पोंचेल. तुम्ही सारीं एकच."

मीराबेननीं पेला रिकामा केला. मंदस्मित करीत म्हणाल्या:

" बापू, खरेंच अमृतासारखें होतें तें दूध."

" तुझ्या नशिबीं होतें, माझ्या नव्हतें." बापू मोठ्यानें हंसून म्हणाले.

सर्वांना आनंद झाला.

• • •

## ४३

गेल्या खेपेस गांधींजी आगाखान पॅलेसमध्यें होते तेव्हां त्यांच्याबरोबर त्यांच्या परिवारांतील मंडळीसुद्धां होती. सरोजिनी नायडूसुद्धां होत्या. आगाखान पॅलेसभोंवतीं होतें एक मोठें आवार. तेथेंच सायंकाळीं बापू फिरत. सुरवातीच्या कांहीं दिवसांत सकाळसंध्याकाळ या आवारांत फिरणें हीच या मंडळींची करमणूक असे.

कांहीं दिवस लोटल्यानंतर सरकारनें या मंडळींची आवारांत खेळण्याची सोय करून दिली. बॅडमिंटनचा खेळ या मंडळीला फार आवडे. सरोजिनीदेवींचा तर हा खेळ खास आवडीचा.

खेळाचें सामान आलें. खेळासाठीं लागणारें खास पटांगण चापून चोपून तयार करण्यांत आलें. सगळी तयारी झाल्यावर सरोजिनीबाई खेळायला पटांगणांत उतरल्या. गांधीजी आपलें

नेहमीचें व्रत पार पाडीत होते. पॅलेसच्या व्हरांड्यात सूत कांतत होते. त्यांची दृष्टि सरोजिनीकडे गेली. ते म्हणाले :

" काय सरोजिनी, एकटीच खेळतेस ? मला घेणार का खेळांत ? "

त्या म्हणाल्या : " बापू, मी काय वाटेल तेव्हां घेईन. पण तुम्हाला खेळायची माहिती असेल तर ना."

बापू म्हणाले, : " वा, त्यांत काय झालं. तूं खेळशील तसं पाहून मी खेळेन." आणि बापू खरोखरीच खेळायला खालीं उतरले. आपल्या पाठीमागें राष्ट्रांत काय चाललें आहे याची सदैव चिंता करणारा तो महापुरुष खेळायला निघाला. आदल्याच दिवशीं या राजकारणी महापुरुषानें एकादें महत्त्वाचें पत्र व्हाइसरॉयला लिहिलें असेल आणि आज तो सर्व चिंता, यातायात विसरून खेळांत रमणार होता.

बापू येतांच सरोजिनीबाईनीं खेळण्यासाठीं फूल हातांत घेतलें तों काय, बापू डाव्या हातांत रॅकेट घेऊन खेळायच्या पवित्र्यांत उभे! सरोजिनीबाई खदखदा हसूं लागल्या. म्हणाल्या : " बापू, रॅकेट कुठल्या हातांत घ्यायची तें माहीत नाहीं आणि खेळायला निघालां ! "

बापू म्हणाले, : " माझं काय चुकलं ? तूं डाव्या हातांत रॅकेट धरलीस. मीहि धरली. तूं करशील तसं मी करणार."

तेव्हां कोठें सरोजिनींच्या ध्यानांत आलं. त्या म्हणाल्या :

"माझा उजवा हात दुखतो म्हणून मी डाव्या हातानें खेळत आहें. तुम्ही आपले उजव्याच हातानें खेळा कसे." महात्माजींनीं हात बदलला. फूल इकडून तिकडे उडूं लागलें. इतक्यांत सरोजिनीबाई खेळायच्या थांबल्या. "हें काय बापू ? पुन्हां डावखोरे खेळतां ?" खरंच बापू पुन्हां डाव्या हातानें खेळत होते. ते म्हणाले : "होय, मी आपला डाव्याच हातानें खेळतों कसा. नाहीं तर मी जिंकल्यावर म्हणायचीस उजव्या हातानें खेळत होतां म्हणून तुम्ही जिंकलंत !"

गांधीजींचा विनोद ऐकून खेळ पहायला जमलेली सगळीच मंडळी हंसूं लागली आणि खेळ पुढें सुरू झाला.

राष्ट्राची नि मानवतेची चिंता वाहणारा महापुरुष अनेक वेळां खेळांत–विनोदांत मग्न झालेला दिसायचा. पाऊणशें वर्षांच्या या वृद्धांत पंचविशींतील तरुणाचा खेळण्याचा उत्साहहि अनेक प्रसंगीं दिसत असे.

• • •

## ४४

गांधीजी जीं व्रतें घेत तीं कांहींहि झालें तरी सोडीत नसत. आपल्या परिवारांतील मंडळींनाहि अशाच प्रकारची शिकवण त्यानीं दिली होती. गांधीजींनीं अनेक व्रतांचा स्वीकार केला

होता. परंतु सूतकताईच्या व्रतावर त्यांचें विशेष प्रेम होतें. कितीहि काम असो. बड्या मंडळींच्या गांठीभेटी असोत, कॉंग्रेसच्या सभा असोत, चर्चा असो. ते रोज कांहीं ठराविक वेळ सूत कांतल्याशिवाय रहात नसत. हेंच व्रत आश्रमांतील अनेक व्यक्तीहि पाळत असत.

एकदा गांधीजी प्रवासाला निघाले होते. बराच लांबचा प्रवास होता. बरोबर इतर मंडळी सुद्धां होती. वेळ सांपडतांच गांधीजींनीं आपली चरक्याची पेटी उघडली. तों काय, आंत कापसाचे पेळू नाहींत. गांधीजी पेळू घेण्यासच विसरले होते. त्यानीं महादेवभाईंना हांक मारली व ते म्हणाले : "अरे महादेव, मी सेवाग्रामहून निघतांना पेळू घ्यायला विसरलों रे. तुझ्यांतले थोडे देशील का ?"

महादेवभाई बराच वेळ कांहीं बोलत ना. गांधीजी पुन्हां म्हणाले : "देतोस ना महादेव ?" तेव्हां महादेवभाई म्हणाले : "बापू मी रोज सूत कांततों. पण आज चरका घ्यायला विसरलों मी." महादेवभाई मान खालीं घालून उभे होते. बापूंच्या डोळ्याला डोळा देण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नव्हतें. नंतर गांधीजींनीं दुसऱ्या एका व्यक्तीजवळ पेळू मागितले. पण तिच्याकडून तोच जबाब आला.

गांधीजी गंभीर झाले, अंतर्मुख झाले. कसल्या तरी गंभीर विचारांत मग्न झाले. लागलीच त्यांनीं पुढील 'हरिजन' मध्यें एक लेख प्रसिद्ध केला. लेखांत त्यांनीं लिहिलें होतें : "मिठानेंच

आपला खारटपणा सोडून दिला तर त्याचा अळणीपणा घालवायचा कोणी ?"—खरेंच, ज्या व्यक्तींनीं सूतकताईचा प्रसार करावयाचा त्यांनींच आपल्या व्रताकडे दुर्लक्ष केलें तर त्यांना व्रत-पालन शिकवायचें कोणी ?

सामान्य व्यक्तींत आपल्या हातून झालेल्या चुका कबूल करण्याचें धैर्य नसतें. पण गांधीजी आपल्या चुका ताबडतोब जगासमोर उघड रीतीनें मांडीत. आत्मशुद्धीचा तो एक प्रकार आहे असें ते मानीत असत.

ते आपल्या एका लेखांत म्हणाले होते : "आपली चूक कबूल करण्यांत जर माणसाला शरम वाटत असेल तर ती चूक मुळांत करण्यांतच त्याला शतपट शरम वाटली पाहिजे."

• • •

## ४५

गांधीजी सेवाग्रामच्या आश्रमांत असतांनाची गोष्ट आहे. आश्रमातील जेवण फारच साधें असे. निरनिराळ्या प्रकारचें चविष्ट अन्न करण्याचें ते टाळीत. साधेंच अन्न परंतु भूक लागेल तेव्हां भरपूर खाल्ल्यानें माणसाची प्रकृति उत्तम राहते असें ते समजत असत. शिवाय आश्रमांत अस्वाद व्रत सर्व आश्रमवासी पाळीत असत.

अस्वाद म्हणजे स्वतःच्या चवीचे चोचले न पुरवतां अन्न सेवन करणें. जेवण साधें असे. परंतु सर्वांना मनसोक्त जेवण्यास मुभा असे. गांधीजी वेळ असल्यास सर्वांना स्वतः वाढीत. कोणी कमी जेवल्यास ते त्याच्या प्रकृतीची चौकशी करीत. विचारपूस करीत. सर्वांमध्यें आनंद, समाधान, संतोष पसरवण्याचा प्रयत्न करीत.

एकदां एक अमेरिकन पत्रपंडित लुई फिशर सेवाग्रामच्या आश्रमांत त्यांची मुलाखत घ्यायला आले होते. त्यांचा आठवडाभर मुक्काम होता. एकदां दुपारीं ते गांधीजींबरोबर जेवण्यास बसले. गांधीजी आश्रमांत अस्वाद व्रताचा प्रचार करीत असत, पण परक्या पाहुण्यांवर जबरदस्ती करीत नसत. शक्य तितकी त्याची चव सांभाळायचा प्रयत्न करीत असत. त्या दिवशीं त्यांनीं फिशरना जेवणाबरोबर आंबा खायला दिला होता. त्यांना तो फार आवडला.

जेवतां जेवतां फिशर गांधीजींना विनोदानें म्हणाले : " गांधीजी, तुम्ही या लोकांना साधें अन्न देतां. त्यांना चव मारायला कां शिकवतां ? तुम्ही अहिंसेचे पुरस्कर्ते. आणि चव 'मारायला' शिकवतां हें कसें ? "

त्यांची कोटि गांधीजींच्या लक्षांत आली. पण ते सवाई विनोदी. ते उत्तरले : " होय फिशरसाहेब, जर जगानें चव मारण्यापर्यंतच आपल्या हिंसेची मजल नेली तर मी सबंध जगाला तसें करण्याची मुभा देईन."

आणि मग सबंध पंगत हंसूं लागली.

गांधीजी अशा रीतीनें बोलतांना विनोद करीत असत. त्यामुळें गंभीर चर्चा चालू असतांनासुद्धां मजेचें वातावरण अनेक वेळां निर्माण होई.

"माझ्या जीवनांत विनोद नसता तर तें मला कधींच नीरस वाटलें असतें" असें गांधीजी एकदा म्हणाले होते.

• • •

## ४६

आज मी तुम्हांला जी गोष्ट सांगणार आहे ती अगदीं अलीकडील आहे. गांधीजी १९४२ च्या लढ्यांत पुण्याला आगाखान पॅलेसमध्यें होतें ना, तेव्हाची.

बापूजी तुरुंगांतहि आपला वेळ फुकट दवडीत नसत. वाचन, लेखन, प्रार्थना, सूतकताई, सर्व कांहीं ठरल्याप्रमाणें चालायचें. त्यातच एकादी नवीन भाषा शिकणें, एखाद्या नवीन ग्रंथकाराची ओळख करून घेणें असें चाले. जवाहरलालजी, आझाद, राजेंद्रप्रसाद हे सर्व पुढारीसुद्धां तुरुंगवासाचा असाच फायदा करून घेत. जवाहरलालजींनीं तर आपले सर्व मोठमोठे ग्रंथ तुरुंगांतच लिहिले आहेत.

त्या दिवशीं गांधीजींचा वाढदिवस होता. लढ्याच्या त्या दिवसांत बाहेर देशांत सर्व जनता तो दिवस गंभीरपणें साजरा

करीत होती. तिकडे सरोजिनीदेवी, डॉ. सुशीला नायर वगैरेंनीं नवीनच टूम काढली. त्या म्हणाल्या : ' बापू, आज सर्व काम बंद. तुमचा वाढदिवस आज." बापू म्हणाले : " सबंध दिवस नाहीं काम बंद करावयाचें. फक्त दुपारीं थोडा वेळ." ठरलें. दुपारीं गांधीजींच्या परिवारांतील मंडळींनीं नवीनच खेळ काढला.

असें ठरलें कीं, जगांतील थोर विचारवंतांचीं भाषणें व लेख काढायचे व आळीपाळीनें प्रत्येकानें त्या विचारवंताचें नांव ओळखावयाचें. इतरांच्या पाळ्या झाल्या. गांधीजींची आली. त्यांना उतारे वाचून दाखविण्यांत आले.

" बापू, ओळखा पाहूं हे उतारे कोणाचे आहेत ते." सर्व ओरडले.

बापूंनीं थोडा वेळ विचार केला नि म्हणाले : " पहिला थोरोचा, दुसरा रोमां रोलां यांचा आणि तिसरा इमर्सनचा किंवा कार्लाइलचा."

सर्वजण ओरडले " चूक एकदम चूक."

आणि मग त्यांच्यापैकीं एकजण म्हणाली : " बापू हे सर्व उतारे एकाच व्यक्तीचे आहेत. त्या व्यक्तीचें नांव आहे मोहनदास करमचंद गांधी !" बापू हंसूं लागले. सगळींच हंसूं लागलीं. नकळतपणें गांधीजींनीं स्वतःला थोर विचारवंतांच्या मालिकेंत स्वतःच बसविलें होतें.

एरव्हीं विनय आड आला असता. पण आज विनयानेंच गांधीजींना चकवलें होतें.

• • •

वाचनालय शाखा
क्र. ४५८६ नों. दि.

गांधीजींपासून जे जे गुण आपल्यापैकीं प्रत्येकानें उचलले पाहिजेत त्यापैकीं एक म्हणजे काटकसर. गांधीजी आपल्या नित्याच्या जीवनांत काटकसरीवर फार कटाक्ष ठेवीत असत. कोणतीहि वस्तु गरजेपेक्षां अधिक वापरणें म्हणजे ते गुन्हा समजत असत. तसें करणें म्हणजे चोरी करण्यासारखें आहे असें ते मानीत असत. आपल्याला गरज आहे त्यापेक्षां कोणतीहि वस्तु अधिक वापरणें म्हणजे दुसऱ्याला ती न वापरूं देणें, म्हणजेच चोरी करणें.

गांधीजी सेवाग्रामला होते तेव्हांची गोष्ट आहे. त्यांच्या आश्रमांत अनेक पाहुणे कोणी भेटायला, कोणी मुलाखती घ्यायला, कोणी चर्चा करायला येत असत. गांधीजींना कांहीं लिहून द्यायचें झालें, किंवा कोणाला चिठ्ठीचपाटी पाठवायची झाली तर त्याना बारीकसारीक कागद लागत. अशा वेळीं चांगले कागद न घेतां ते फुकट गेलेले कागदाचे तुकडे वापरीत असत.

सरकारी पत्रकें येत. त्यांच्या चारी बाजूला भरपूर जागा सोडलेली असे. बाजूचे हे कोरे कागदाचे कपटे कापून गांधीजी वापरीत असत.

एकदां बरीच आश्रमवासी मंडळी होती. गांधीजींनीं समोर

पडलेली कात्री घेतली नि त्यांनीं कोरे कपडे कापून घ्यायला सुरवात केली. पण त्यांना हें काम नीटसें जमेना. जवळच बसलेला एक आश्रमवासी म्हणाला : “ बापू, आणा ती कात्री इकडे. तुम्हांला नाहीं तें काम जमत. मला संवय आहे.”

गांधीजी म्हणाले : “ नाहीं जमत म्हणजे काय ? प्रयत्न करणें तर माझ्या हातीं आहे.” आणि गांधीजींनीं काम पुढें सुरू केलें. कांहीं केल्या त्यांना व्यवस्थित कापतां येईना. पण त्यांनीं धडपडत का होईना काम पुरें केलें.

काम तितकेसें साधलें नाहीं. पण पूर्ण तर झालेंच.

बापूजी कांहीं बाबतींत फार हट्टी होते. अमूक एक गोष्ट येत नाहीं, हें त्यांना खपत नसे. काम उत्तम करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणें करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें ते समजत.

• • •

## ४८

गांधीजी तिथळ येथें राहत होते. त्यांचा तेथें मुक्काम असता बोर्डी येथील गोखले शिक्षणसंस्थेंतील एक शिक्षक तेथें गेले होते. त्यांचें नांव श्री. ग. म. मळेकर. गांधीजींची व त्यांची चांगलीच गट्टी जमली. कारण गाधीजी हे नामदार गोखल्यांना गुरुस्थानीं मानीत असत. हे शिक्षक ३–४

दिवसच बापूजींच्या सहवासांत होते. परत येण्यास निघतेवेळीं ते शिक्षक बापूजींस म्हणाले : " बापूजी, तुम्ही एकदां बोर्डीस या. काका ( काकासाहेब कालेलकर ) पण २–४ महिने तेथें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं आले होते व त्यांची प्रकृति पण बोर्डीस निसर्गरम्य वातावरणांत चांगलीच सुधारली होती." बापूजी म्हणाले : " बरें तर. मी आजारी पडलों कीं बोर्डीस जरूर येईन." त्या शिक्षकांना फार वाईट वाटलें. ते म्हणाले : " बोर्डीस येण्यासाठीं आजारी पडूं नका. आपण चांगले असतांनाच यावें." बापूजी म्हणाले : " येईन. पण एका अटीवर. तुम्ही ज्या गांवांत राहतां त्या गांवांत १०० कुटुंबें खादीधारी व १०० अशीं कुटुंबें कीं जीं एक हरिजन घरांत बाळगतील अशी बनवा व मग मी बोर्डीस अवश्य येईन." ते शिक्षक कांहींच बोलले नाहींत. सामान्य व्यक्तींकडून पण कांहीं तरी उपयुक्त काम करून घेण्याची असामान्य कला बापूजींत पूर्णत्वानें होती.

ते शिक्षक बापूजींची अट पुरी करूं शकले नाहींत. बापूजींचें अत्यंत आवडतें असें जें हरिजन कार्य, त्याला मात्र ते प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें खूप मदत करीत असतात. अट पुरी न झाल्यानें बापूजी बोर्डीस कधींच आले नाहींत. पण गांधीजींनीं दिलेला शब्द त्यांनीं मृत्यूनंतरहि पाळला. रक्षेच्या रूपानें गांधीजी बोर्डीस आले व त्यांनीं त्या शिक्षकांस दिलेला शब्द पाळला.

" दिलेला शब्द प्राणापलीकडे पाळणें यांतच सर्व शील सांठविलेलें असतें" बापूजींची अशी अत्यंत थोर शिकवण असे.

• • •

# ४९

महात्माजींचें जीवन हेतुमय होतें. जें जें जीवनोपयोगी त्याची त्याची त्यांनीं उपासना केली. ते यंत्रविरोधी नव्हते. ते कितीदां म्हणाले : " शिवण्याच्या यंत्राचा ज्यानें शोध लावला त्याचे किती उपकार ! "

ते म्हणाले : " मलाहि विजेची शक्ति हवी आहे. ती झोपडी-झोंपडींत मला नेतां आली आणि तेथील ग्रामोद्योगांना लावतां आली तर किती सुंदर होईल ! " उपकारक यंत्र त्यांना हवें होतें.

साबरमती आश्रमांत महात्माजी राहत असत त्यावेळची ही गोष्ट आहे. महात्माजी आश्रमांतून अहमदाबाद शहरांत कांहीं तरी महत्त्वाच्या कामासाठीं गेलेले होते. परंतु दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांना सभेला जायचें होतें. गांवांतील कामांत बराच वेळ गेला. ते त्या कामांत व्यग्र होते. झपूझप् पावलें टाकीत तो निर्भय पुरुष, तो कर्मयोगी येत होता. इतक्यांत तिकडून आश्रमांतलें कोणी तरी सायकलवरून येत होतें. महात्माजींना बघतांच तो सायकलस्वार उतरला.

" कोठें चाललास ? "महात्माजींनीं विचारलें.

" बापू , तुम्हांला त्या सभेला जायचें आहे. दहा मिनिटेंच राहिली. मी तुम्हांला आठवण देण्यासाठीं येत होतों. नाहीं तर मागून म्हणालां असतांत मला कळवलें कां नाहीं ! "

" ती सभा आजच ठरली वाटतें ?"

" हो. आणि वेळहि होत आली."

" दे तर तुझी सायकल."

" तुम्ही सायकलवरून जाणार ? पडाल हो. शहरांत गर्दी असते बापू."

" जें मी आफ्रिकेंत शिकलों तें विसरण्यासाठीं नाहीं. सायकलवर सर्वांना बसायला आलें पाहिजे. आण, वेळ नको दवडूं."

असें म्हणून बापू सायकलवर बसले आणि वेगानें गेले. आश्रमवासी पहात राहिला. सायकलवर बसलेली बापूंची मूर्ति डोळ्यांसमोर आणून गंमत वाटते नाहीं ?

• • •

## ५०

महापुरुष सत्यव्रत असतात. जो शब्द दिला तो ते पाळतात. म्हणून रामचंद्राला आपण एकवचनी म्हणतों.

रघुकुल रीति सदा चलि आयि
प्राण जाय पर वचन न जाई ॥

प्राण गेला तरी दिलेलें वचन जाणार नाहीं असा रघुकुलाचा महिमा होता. श्री रामकृष्ण परमहंस तोंडांतून जो शब्द बाहेर

पडला तो सत्य धरीत. समजा कोणी 'दूध घ्या' म्हटलें. आणि तोंडांतून 'नको' शब्द बाहेर पडला तर रामकृष्ण परमहंस मग दूध घेत नसत. जो शब्द बाहेर पडला त्याची का फसवणूक करायची ? तो का वाया दवडायचा ? महात्मे अशा तीव्रतेनें सत्याची उपासना करतात.

महात्माजींचेंहि असेंच असे. कलकत्त्याचें 'मॉडर्न रिव्ह्यू' मासिक जगप्रसिद्ध आहे. त्याचे संपादक रामानंद चतर्जी आतां जिवंत नाहींत. परंतु ते होते त्यावेळची गोष्ट आहे. १९३० सालच्या आधींचा प्रसंग. रामानंदांनीं महात्माजींना मासिकासाठीं लेख लिहायला सांगितलें होतें.

"मला वेळ केव्हां होणार ?" बापू म्हणाले.

"चार ओळी तरी पाठवा."

"बरें केव्हां तरी पाठवीन."

महात्माजींच्या शिरावर राष्ट्राचा संसार. लाहोरची कॉंग्रेस झाली. स्वातंत्र्याचा ठराव झाला. महात्माजींनीं व्हाइसरायांकडे त्या ऐतिहासिक अकरा मागण्या केल्या. सरकारचा नकार आला. स्वातंत्र्याचा देशव्यापी संग्राम कसा सुरू करायचा, याच्या विचारांत महात्माजी व्यग्र होते. त्यांना मीठ दिसलें. मिठाचा कायदेभंग करायचा असें ठरलें. ते आश्रमांतून बाहेर पडले. पायीं प्रवास, मुलाखती, प्रार्थना, सभा—अपार कार्य. परंतु त्यांतहि महात्माजी म्हणायचे : "मॉडर्न रिव्ह्यूला लेख

पाठवीन असें म्हटलें आहे. केव्हां वेळ काढूं ? ” रोज त्यांना त्या दिलेल्या शब्दाचें स्मरण होई. शेवटीं एके दिवशीं लहानसा लेख राष्ट्रपुरुषानें पाठविला.

त्या लेखाची गंमत झाली. तो लहानसा लेख त्या मासिकाच्या कचेरींत कोठें पडला कोणास माहीत ! रामानंदांचें पुन्हां पत्र आलें. महात्माजींनीं उत्तर लिहिलें : “ लेख तर पाठवला.” मग शोधासाठीं धांवपळ सुरू झाली. केराच्या टोपलींत सांपडला. ते अमोल शब्द सांपडले. रामानंदानीं महात्माजींना पत्र लिहून दिलगिरी दाखविली. अशी ही गोष्ट आहे. शब्द दिला तर पाळावा. अशक्य, अपरिहार्यच झालें तर गोष्ट निराळी.

• • •

## ५१

एकदां बंगालच्या दौऱ्यावर असताना गांधीजी एका जमीन-दाराचे पाहुणे होते. हा जमीनदार नेहमीच्या संवयीप्रमाणें प्रत्येक कामासाठीं नोकराचा उपयोग करीत असे. नोकरांची सर्व धांवपळ या जमीनदाराचीं कामें करण्यासाठीं.

एक दिवस बंगल्याच्या व्हरांड्यांत नेहमींप्रमाणें गाधीजी प्रार्थनेसाठीं उच्चासनावर बसले. समोर त्यांची प्रार्थना व प्रार्थनोत्तर प्रवचन ऐकायला खूप मंडळी बसली होती. त्या वेळीं गांधीजी पेटत असलेले दिवे मालवून प्रार्थना करीत असत.

प्रार्थना सुरू होतांना जमीनदार त्यांच्याजवळ येऊन बसला. प्रार्थना सुरू होण्यापूर्वी गांधीजींनीं जमीनदाराला दिवे मालवण्यास खूण केली. दिव्याचें बटण जमीनदाराच्या डोक्यावरच होतें. पण त्यानें संवयीप्रमाणें नोकराला बोलावलें.

तोंच चमत्कार झाला. दिवे एकाएकीं मालवले गेले व काळोखांत प्रार्थनेला सुरुवात झाली. गांधीजींनीं स्वतः उठून पटकन् बटन दाबलें होतें.

प्रार्थनेनंतरच्या प्रश्नोत्तराच्या वेळीं गांधीजी संधि साधून म्हणाले : "अलीकडच्या शिकलेल्या व श्रीमंत लोकांना शरीर-श्रम करणें ही फार शरमेची व नीच गोष्ट वाटते. पण ती चूक आहे. गीतेंत तर सांगितलें आहे कीं जो शरीरश्रम न करतां अन्नसेवन करतो तो चोर आहे."

जमीनदाराला आपली चूक कळली. आपल्याला मारलेला टोमणा त्यानें ओळखला आणि नंतर...

नंतर एक गंमत झाली. गर्दीमध्यें जवळचेंच एक टेबल लवंडल्यामुळें त्याच्यावरील चिनी मातीची एक कुंडी खालीं गडगडून फुटून गेली होती. लगेच जमीनदारानें उच्चासनावरून खालीं उडी मारून त्या फुटलेल्या कुंडीचे तुकडे गोळा करण्यास सुरवात केली.

थोड्याच वेळांत दोन नोकर तुकडे गोळा करायला धांवत आले. पण मालकच गुढग्यावर बसून तुकडे गोळा करीत होता.

हा प्रकार बापूजींनीं पाहिला नाहीं. परंतु त्यांच्या शब्दांनीं मात्र त्यांच्या नकळत आपलें काम केलें होतें.

बापूजींचें धांवतें जीवनसुद्धा शिकवणींनीं भरलेलें होतें.

त्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण आजूबाजूच्या जगाला आपला संदेश देत होता.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ५२

महात्माजी स्वातंत्र्याचे भोक्ते. लादालादीचा धर्म त्यांना आवडत नसे. ते नेहमीं म्हणायचे कीं मी लोकशाहीचा सर्वांत मोठा उपासक आहें. खरें प्रेम स्वातंत्र्य देणारें असतें. खरें प्रेम कधीं गुलाम करीत नसतें. परमेश्वराचें प्रेम असें निरपेक्ष असतें. तुम्ही चांगले वागाल या आशेनें तो सूर्य, चंद्र, तारे, मेघ, फुलें सारें देतच असतो. महापुरुष असेच असतात.

अस्पृश्यता निवारणाचा १९३३–३४ मधील महात्माजींचा दौरा मध्यप्रान्तापासून सुरू झाला. थोर देशभक्त बॅ. अभ्यंकर महात्माजींबरोबर त्यांच्याच मोटारींत मध्यप्रान्तभर होते. बॅ. अभ्यंकर स्पष्टवक्ते. त्यांची भक्ति निर्भयच असे. खरें प्रेम निर्भयच असतें. जेथें भय आहे, संकोच आहे, तेथें प्रेम कोठलें ?

बॅ. अभ्यंकर गांधीजींना मोटारींतून जातांना म्हणाले "तुमच्याबरोबर प्रवास करणें मोठें कठिण, जिकिरीचें."

"कां, काय झालें ?" गांधीजींनीं हंसून विचारलें.

"तुमच्याबरोबर मला सिगारेट ओढतां येत नाहीं ! तुमच्या-देखत कशी ओढायची ? कुचंबणा होते" अभ्यंकर म्हणाले.

"तुम्ही ओढूं शकतां. खरेंच ओढा" गांधीजी मोकळे-पणानें म्हणाले.

गांधीजींनीं परवानगी दिली. परंतु महात्माजींबरोबर हिंडत असेपर्यंत बॅ. अभ्यंकरांनीं एकहि सिगारेट ओढली नाहीं.

• • •

## ५३

महात्माजींचें हास्य म्हणजे अपूर्व वस्तु होती. जवाहरलाल आत्मचरित्रांत म्हणतात : "महात्माजींचें हास्य ज्यानें पाहिलें नाहीं त्यानें फार मौल्यवान् वस्तु गमावली असें मी म्हणेन." महात्माजींनीं कोठेंतरी म्हटलें आहे : "माझ्या ठिकाणीं हास्य नसतें, विनोद नसता तर मी कधींच चिरडला गेलों असतों." काकासाहेब कालेलकर महात्माजींच्या हास्याला मुक्तपुरुषाचें हास्य म्हणत.

१९३४ च्या अखेरीस मुंबईस राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें

होतें. अधिवेशन समाप्त झालें. पुढारी आपापल्या गांवीं जाऊं लागले. त्या वेळेस राजेंद्रबाबू अध्यक्ष होते. ते आज परत जायचे होते. सकाळची आठाची वेळ. तेथील सभांगणांत महात्माजी, राजेंद्रबाबू, सरदार आदि थोर थोर मंडळी उभी होती. मी दुरूनच तो प्रसंग पहात होतों. राजेंद्रबाबूंनीं महात्माजींच्या चरणांना स्पर्श केला. वातावरण गंभीर झालें. डोळ्यांतून अश्रु चमकले. वातावरणाचा भार कमी करण्याची जादू महात्माजीच जाणत. शेजारीं एक स्वयंसेवक होता. महात्माजींनीं त्याच्या डोक्यावरची टोपी घेऊन सरदारांच्या डोक्यावर ती चढविली ! सारे मोठ्यानें हंसले. महात्माजींनीं मुक्तहास्य केलें. गंभीर वातावरण पुन्हां आनंदमय झालें.

• • •

## ५४

त्यावेळेस महात्माजी आगाखान राजवाड्यांत पुण्याला अटकेंत होते. ४२ च्या लढ्याचे ते अमर दिवस. स्वातंत्र्याचा चलेजावचा लढा सुरू झाला आणि महात्माजींचा महादेव अकस्मात् देवाघरीं गेला. बापूंचा उजवा हात गेला. त्यांची वेदना तेच जाणोत. जेथें दहन झालें तेथें गांधीजींनीं लहानशी समाधि बांधली. झाड लावलें. रोज त्या समाधीजवळ ते जायचे व फुलें वहायचे. गांधीजी भावसिंधु होते.

एके दिवशीं राष्ट्राचा पिता महादेवभाईच्या समाधीला नित्याप्रमाणें भेट देऊन परतत होता. त्या लहान अरुंद मार्गानें ते येत होते. तों पलीकडे कुंपणाआड त्यांना हरणाचें एक निष्पाप पाडस दिसलें. त्या पाडसानेंहि बापूंकडे करुण दृष्टीनें पाहिलें. बापू बंधनांत होते. बापू बघत राहिले. भरल्या अंतःकरणानें ते गेले. संतांना सर्वांविषयीं प्रेम. वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें असें तुकाराम म्हणत. भारतीय संस्कृति म्हटली म्हणजे आश्रम, हरणें डोळ्यांसमोर येतात. आणि त्या पाडसाला पाहून बापूंना का महादेवाचा आत्मा आठवला ?

दुसऱ्या दिवशीं तुरुंगाचे अधिकारी आले. बापू म्हणाले : "तें तिकडे हरिण असतें. तें स्थानबद्ध, मीहि स्थानबद्ध. आम्हां दोघांना भेटायची परवानगी असूं दे."

संशयी अधिकाऱ्यांनीं तें हरिणच तेथून हलाविलें ! बापूंना तें हरिण पुन्हां दिसलें नाहीं.

म. ग्रं. सं. ठाणे, बालमालिका
दा. क. ५४८६
अनुक्रम २०६७०
विभाग बा.वा.
क्रमांक ५८३
नों. दि. १९।१२।५४
IRBK-0105486
IRBK-0105486